# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 05 January 2025

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०५ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

दिल्लीसाठी आजचा दिवस अतिशय महत्वपूर्ण आहे. आज पहिल्यांदाच नमो भारत ट्रेन राजधानीत प्रवेश करणार आहे. त्याठिकाणी दिल्ली मेट्रोसह इतर विकास कामांचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक संपर्क माध्यमावर दिली आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी गाजियाबाद जिल्ह्यातील साहिबाबाद रेल्वे स्थानक ते दिल्लीतील न्यू अशोकनगर रेल्वेस्थानकादरम्यान नमो भारत रेल्वेनं प्रवास केला. या प्रवासात त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. त्यावेळी एका विद्यार्थिनीनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर कविता सादर केली.

****

छत्तीसगढमध्ये आज सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले आहेत. या गोळीबारामध्ये सुरक्षादलाचा एक जवानही हुतात्मा झाला. सुरक्षा दलांनी मारलेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. या घटनास्थळावरून शस्त्रांस्त्रासह दारूगोळा मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आला आहे. अद्याप गोळीबार आणि शोध मोहिम सुरूच असल्याचं याविषयीच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सर्व मातृभाषांचं जतन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं केंद्रिय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी म्हटलं आहे. आज हैदराबाद इथं जागतिक तेलुगू कॉन्फेडरेशनच्या परिषदेत रेड्डी बोलत होते. तेलगू भाषेचं संगणकीकरण करण्याची गरज असल्याचं मतही रेड्डी यांनी व्यक्त केलं.

****

चीन इथं पसरलेल्या एचएमपी विषाणूच्या प्रसारावर केंद्र सरकारच्या सर्व माध्यमांद्वारे बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. केंद्र सरकारने गेल्या काही आठवड्यांपासून चीनमध्ये वाढणाऱ्या श्वसनाच्या आजाराबद्दल वेळेवर माहिती देण्याची विनंती, जागतिक आरोग्य संघटनेला केली आहे. एचएमपी हा विषाणू भारतासह जगभरात पसरत आहे, असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या संयुक्त देखरेख गटाला आढळून आलं असून, ICMR आणि IDSP च्या सहाय्यानं इन्फ्लूएंझा सारख्या आजारासाठी आणि तीव्र श्वसनाच्या आजारासाठी भारतात आधीच मजबूत पाळत ठेवणारी यंत्रणा आहे, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भाजप हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे. राज्यात मागील तीन विधानसभा निवडणुकांमध्ये १०० पेक्षा अधिक जागा जिंकणारा पक्ष हा भाजपच आहे. त्यामुळं राज्यात दीड कोटी सदस्य नोंदणी करण्याचे उद्दीष्ठ ठरवलं आहे. ते पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनीधींसह पदाधिकाऱ्यांना मेहनत घ्यावी लागेल, असं प्रतिपादन भाजप नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते नागपूर इंथ भाजपच्या राज्यातील सदस्य नोंदणी उद्घाटन समारंभात बोलत होते.

****

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि परभणीतल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यृ प्रकरणी पुण्यात सर्वपक्षीय जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासह इतर नागरिक सहभागी झाले आहेत.

****

परभणी इथंल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया निषेध करते, तसच या प्रकरणाची चौकशी विशेष पोलीस अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी अशी, मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. ते आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमधे जर महायुतीनं योग्य स्थान दिलं नाही तर स्वबळावर लढू, असं देखील आठवले यांनी स्पष्ट केलं.

****

नांदेड जिल्ह्यातल्या माळेगाव यात्रेनिमित्त कचरामुक्त यात्रा ही मोहीम राबवण्यात येत असून, यात्रेतील स्वच्छता आणि कचरामुक्तीच्या उद्देशानं ग्रामपंचायतीनं पुढाकार घेऊन विशेष मोहीम हाती घेतली आहे. दररोज सकाळी ५ वाजता आणि रात्री ११ वाजेदरम्यान यात्रेतील गर्दी कमी झाल्यानंतर स्वच्छता कर्मचारी प्लास्टिकसह इतर कचरा उचलत आहेत. दरम्यान, यंदाही यात्रेकरुंना फिरत्या शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषद आर्थात मसापच्यावतीनं मराठी साहित्यातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांचा आज सायंकाळी पाच वाजता छत्रपती संभाजीनगरातील ना.गो. नांदापूरकर सभागृहात मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. डॉ. रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षाग्रंथास नुकताच साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. या निमित्तानं हा सन्मान केला जाणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यीक डॉ. चंद्रकांत पाटील हे डॉ. रसाळ यांच्या साहित्यिक कारकिर्दीवर भाष्य करणार आहेत.

****

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागानं संक्रांतीच्या सणानिमित्त प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता काही विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

****

गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यात भजेपार इथं आज राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते 'भजेपार कबड्डी चषक २०२५' चा उद्घाटन सोहळा पार पडला. या तीन दिवसीय कबड्डी स्पर्धेमध्ये महाराष्ट्रसह मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यातील अनेक खेळाडू सहभागी होणार आहेत.

****